सं.फौ.ख.क्र.३०९/२०२३

सरकार –वि– विजय चोपडे

नि.क्र.१९

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव — साजीद खान जकाउल्ला खान,

वय ५३ वर्षे, व्यवसाय — चालक,

रा. माटरगांव, ता.शेगांव, जिल्हा – बुलडाणा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती शहा, सरकारी वकील.</u>**

१. न्यायालयात उपस्थित असलेल्या आरोपीला मी ओळखत नाही. राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी मला पंचनामा करण्यासाठी कोठेही बोलविले नव्हते. राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी माझ्या समक्ष आरोपीच्या घरुन काहीही जप्त केले नव्हते. माझ्या समक्ष कोणतीही लिखापडी करण्यात आली नव्हती. राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी जलंब पोलीस स्टेशनच्या समोर माझी सही घेतली होती. माझी सही कशासाठी घेण्यात आली याबाबत मला सांगितले नव्हते. आता मला घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर पंच क्र. २ म्हणुन माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहिती नाही. त्याला सही पुरता **<u>नि.क्र. २०</u>** देण्यात येते.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने सरकारी अभियोक्ता यांच्या विनंती वरुन उलट तपासणी करण्याची परवानगी देण्यात येत आहे</u>. <u>उलट तपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांच्यामार्फत</u> :–**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. १७.१२.२०२२ रोजी दुपारी ०४.०० वाजेच्या दरम्यान ग्राम माटरगाव येथे रेल्वे स्टेशनच्या परिसरात आरोपीच्या घरी पंच म्हणून बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी माझ्या समक्ष आरोपीच्या घराची झडती घेतली असता एका खरड्याच्या खोक्यात ९० मि.ली. च्या ५० देशी दारुच्या बाटल्या मिळून आल्या. हे म्हणणे खरे नाही की, राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी त्या सर्व बाटल्या जप्त करुन त्यामधून एक बाटली रासायनिक विश्लेषणासाठी वेगळी काढून त्यावर माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार करुन तो मला वाचून दाखविला व मी त्यावर वाचून समजून सही केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस दुसरा पंच शिवाजी शंकर फाडके याने सुध्दा पंचनाम्यावर सही केली होती. मी

काळीपिवळी गाडीचा चालक आहे. मी माझी काळी पिवळी शेगाव ते नांदुरा या रस्त्यावर चालवितो. हे म्हणणे खरे नाही की, मी टॅक्सी चालक असल्यामुळे आरोपीला ओळखतो कारण की तो माझ्या टॅक्सीमध्ये येणे जाणे करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला शिक्षेपासुन वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे श्रीमती तळणीकर यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर, आरोपीने साक्षीदाराला काहीही विचारायचे नसल्याचे सांगितल्याने साक्षीदाराचा उलटतपास नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/- | स्वा/- |
| (एन. डी. मेश्राम ) | (एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.१८.०२.२०२५ | दि.१८.०२.२०२५ |